## दिन विशेष...

१९४५ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा स्मृतिदिन.
१७०० : बाजीराव पेशवे यांचा जन्म.
१९०० : विजयालक्ष्मी पंडित यांचा जन्म.
१९७९ : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे निधन.
१९८८ : गुरुवर्य बाबूराव गणपतराव जगताप यांचा जन्म.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८०५९७.६६ +५७.७५(०.०७२%)
डॉलर ₹ ८७.६५

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | २५ |
| दिल्ली | ३४ | २७ |
| मुंबई | २८ | २५ |
| नागपूर | २९ | २४ |
| पुणे | २५ | २२ |

epaper.shauryamarathi.com जळगाव | सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ वर्ष १ ले | अंक २७९ किंमत : ५ रु. | पाने ४


# दी जळगाव पीपल्स बँकेविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी अन्नत्याग उपोषणाचा पाचवा दिवस

## • उपविभागीय पोलिस अधिकारी गेले सुटीवर; गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत लढा सुरुच राहणार

प्रतिनिधी । चोपडा

दी जळगाव पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेने खोट्या सह्या करून केलेल्या फसवणुकीच्या प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल होत नसल्यामुळे सागरभाऊ ओतारी यांनी दि. १४ ऑगस्टपासून चोपडा शहर पोलीस स्टेशन समोर सुरू केलेले आमरण अन्नत्याग उपोषण सलग (रविवारी) पाचव्या दिवशीही सुरुच आहे. या उपोषणाला संपूर्ण चोपडा शहरातून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपोषण स्थळी भेट देत पोलीस प्रशासनास जाब विचारीत आहे. तसेच सर्व पक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते व सामान्य नागरिक उपोषण स्थळी भेट देऊन पोलीस प्रशासनाबद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत.



### • तपास अधिकाऱ्यांचा प्रस्ताव रखडला

सदर प्रकरणातील तपास अधिकारी आणि चोपडा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी सदर प्रकरणी तपास पूर्ण करून मा. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे बँकेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी वारंवार लेखी परवानगी मागितली होती. मात्र उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी असमाधानकारक कारणे देत गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिलेली नाही.









### • न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहील

१४ ऑगस्ट २०२५ पासून चोपडा शहर पोलीस स्टेशन समोर सुरु झालेल्या या उपोषणाला उपोषणकर्ते सागरभाऊ काशिनाथ ओतारी यांनी न्याय मिळेपर्यंत लढा सुरु राहील, असा ठाम निर्धार व्यक्त केला आहे.

### • उपोषणार्थी सागरभाऊ ओतारी यांची प्रकृती खालावली

उपोषणार्थी सागरभाऊ ओतारी यांची प्रकृती खालावली असून दिवसातून सकाळ व संध्याकाळ असे दोन वेळा उप जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय पथक उपोषण स्थळी येऊन तपासणी करीत आहे. प्रकृती खालावल्याने वैद्यकीय पथकाने उपचारार्थ उप जिल्हा रुग्णालयात दाखल व्हा, असे सागरभाऊ ओतारी यांना सांगितले. मात्र श्री. ओतारी यांनी रुग्णालयात दाखल होण्यास व कोणतेही उपचार घेण्यास नकार दिला आहे.











### मा. उच्च न्यायालयाने बँकेची याचिका फेटाळल्याने गुन्हा दाखल करण्याचा मार्ग झाला होता मोकळा

दि. २६ एप्रिल २०२५ रोजी चोपडा शहर पोलीस स्टेशन ला दाखल केलेल्या फसवणुकीच्या तक्रारीवर अद्याप गुन्हा नोंदविला गेलेला नाही.

सदर फिर्याद दाखल होऊ नये म्हणून बँकेने मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट पिटीशन क्र. ७९८/२०२५ दाखल केली होती. त्यावर दि. २४ जून २०२५ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी झाली, त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने बँकेची याचिका फेटाळत असल्याचे सांगताच बँकेतर्फे वरिष्ठ ॲड. एस. बी. देशपांडे व ॲड तपन संत यांनी याचिका मागे घेत असल्याचे सांगितल्यावर मा. उच्च न्यायालयाने सदर याचिका रद्द केली. तरी देखील पोलिसांनी गुन्हा नोंदविला नसल्याने पोलिस प्रशासनावर गंभीर आरोप होत आहेत. यामुळे बँकेला पाठीशी घालून सर्वसामान्य जनतेला न्यायापासून वंचित ठेवल्याचा निषेध व्यक्त होत आहे.

### • उपोषणकर्त्यांच्या मागण्या

* संबंधित आरोपींवर तात्काळ गुन्हा नोंदवून अटक करावी.
* अन्यायाला पाठबळ देणाऱ्या व जळगाव पीपल्स बँकेला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी.

### • नागरिक व कार्यकर्त्यांचा मोठा पाठिंबा

उपोषणाला शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, चोपडा शहर व तालुक्यातील सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. उपोषण स्थळी कार्यकर्त्यांची रिघ लागली आहे तरी देखील उपोषण लोकशाही मार्गाने शांततापूर्ण वातावरणात सुरु आहे.

### • स्वातंत्र्य दिनीही न्यायाची याचना

१५ ऑगस्ट सारखा राष्ट्रीय सणाच्या दिवशीही अन्यायाविरोधात उपोषणाला बसावे लागते, आणि न्यायाची याचना करावी लागते ही एक शोकांतिका असल्याचे मत उपोषणास भेटी देणाऱ्या विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या. हे पोलिस प्रशासनासाठी नामुष्कीचे ठरत असल्याच्या प्रतिक्रिया सर्व सामान्य जनतेमधून उमटत आहे.






### • पोलिस प्रशासनाने चोपडा वासियांचा विश्वास गमावला

पोलिस प्रशासनाच्या अन्यायाला साथ देण्याच्या भूमिकेमुळे पोलिस प्रशासनावर जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे मत व्यक्त होत आहे. सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच उपोषणास बसावे लागते तर सामान्य जनतेचे काय हाल होत असतील, अशी प्रतिक्रिया वेंडर पुरुषोत्तम साळुंखे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

















# ईद,गणेशोत्सव विसर्जन मार्गावर सीसीटीव्ही बसविण्यासाठी सात कोटींची तरतूद : ना.कोकाटे

## • नंदुरबारात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शांतता समितीची बैठक

**प्रतिनिधी । नंदुरबार**

**आगामी गणेशोत्सव आणि ईद हे सण शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारीची रूपरेषा आखली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात भरलेल्या शांतता समितीच्या बैठकीत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण तसेच अल्पसंख्यांक विकास मंत्री व नंदुरबारचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सुरक्षितता आणि पायाभूत सुविधांबाबत स्पष्ट निर्देश दिले.**




पालकमंत्र्यांनी सांगितले की, गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी स्वतंत्र ७ कोटी ५० लाखांची आर्थिक तरतूद केली आहे. याशिवाय, नागरिकांच्या जीवितास धोका ठरणाऱ्या लोंबकळणाऱ्या विद्युत तारांची तात्काळ दुरुस्ती करण्याचे आदेश वीज महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. विसर्जनमार्ग सुरक्षित, प्रकाशमय आणि अडथळामुक्त ठेवणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे, असे कोकाटे म्हणाले. यावेळी पालकमंत्र्यांनी अंडरग्राउंड बीज तारा टाकण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यासही सांगितले.

पुढील काळात कार्यवाही जलद व्हावी यासाठी, गणेशोत्सवापूर्वी किमान दोन महिने आधी शांतता समितीची बैठक घेण्याची पद्धत राबवावी, अशीही सूचना त्यांनी केली. यामुळे थांतता समीती बैठक समस्या ओळखणे, नियोजन आणि अंमलबजावणी यांना पर्याप्त वेळ मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस जा. चंद्रकांत रघुवंशी, आ. आमश्या पाडवी, आ.राजेश पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर, अंजली शर्मा, निवासी श्रीमती कल्पना ठुबे, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, डॉ. अभिजीत मोरे, शांतता समितीचे सदस्य व संबंधित विभागाचे प्रमुख, गणेश मंडळांचे पदाधिकारी य उपस्थित होते. शहरातील प्रमुख मुद्यांवर सदस्यांनी सूचनामांडल्या असून मांडलेल्या प्रत्येक सूचनेची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले. गणेशोत्सव आणि ईद या दोन्ही सणांवर कोणतेही गालबोट लागू नये, हीच अपेक्षा.प्रशासन सर्वतोपरी मदत करेल; मात्र नागरिकांनीही सहकार्याची भूमिका ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे, असे कोकाटे यांनी नमूद केले. पालकमंत्री ड. कोकाटे म्हणाले की, गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद हे दोन्ही सण एकत्र येत असून सर्व समाजबांधवांनी हे सण शांततेत पार पाडावेत. शांतता समितीच्या सर्व सदस्यांना ओळखपत्रांचे वाटप करण्यात येईल, गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता मंडळाच्या अध्यक्षांनी व पोलिस प्रशासनाने घ्यावी आणि नागरिकांनीही सहकार्य करावे. गणेश मंडळांनी सामान्य नागरिकांनी त्रास होणार नाही असेच देखावे सादर करावेत. अंमली पदार्थ विरोधी तसेच समाजप्रबोधनपर देखावे सादर करण्यास प्राधान्य द्यावे, तर राजकीय देखावे सादर करू नयेत, राज्य शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. असेही त्यांनी स्पष्ट केले. गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील विद्युत प्रवाहाची दुरुस्ती करावी तसेच लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि गणेश मंडळाचे अध्यक्ष यांनी समन्वयातून गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडावी, असेही त्यांनी सांगितले तसेब, जिल्ह्यातील शहादा, नंदुरबार व गुजरातमधील काही गणेश मंडळांची मूर्ती विसर्जनासाठी सारंगखेडा व प्रकाशा नदीपात्रात आणली जाते. त्यामुळे तेथील दोन्ही पुलांच्या बाजूंची तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्ती करावी, असेही निर्देश पालकमंत्री कोकाटे यांनी यावेळी दिले.

# संपादकीय

## श्वानपुराण

१४० कोटींपेक्षा अधिक लोकसंख्येच्या भारतामध्ये सध्या मानवी समस्यांपेक्षाही प्राण्यांना भेडसावत असलेल्या समस्यांवर जास्त चर्चा घडत आहेत. कोल्हापूर येथील नांदणी मठातील महादेवी हत्तीचा विषय असो किंवा मुंबईतील दादर येथील कबुतरखान्याचा विषय असो या विषयांना संपूर्णपणे पूर्णविराम मिळण्यापूर्वीच आता भटक्या कुत्र्यांचा विषय समोर आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी भटक्या कुत्र्यांबाबत दिलेल्या एका आदेशामुळे ही चर्चा सुरू झाली आहे. राजधानी नवी दिल्लीतील सर्व भटकी कुत्री आठ आठवड्यांच्या आत पकडून त्यांना एका वेगळ्या आश्रयस्थानाकडे पाठवावे अशा प्रकारचा आदेश सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्यानंतर या आदेशावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. बुधवारी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासमोर हा विषय आला असता त्यांनी आपण या प्रकरणात लक्ष घालू, असे सांगितले आहे. पण सर्वोच्च न्यायालयाच्याच एका न्यायाधीशानी हा निर्णय दिला असल्याने या विषयात व्यवस्थित लक्ष घालून निर्णय घ्यावा लागेल, असे संकेत सरन्यायाधीशांनी दिले आहेत. अर्थात, सर्वोच्च न्यायालयाच्या मूळ आदेशानंतर देशात सर्वत्र श्वानप्रेमींनी निषेधाची भूमिका घेतली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्राण्यांसाठी नेहमीच झटणाऱ्या मनेका गांधी आणि विविध सेलिब्रिटी यांनी न्यायालयाच्या या आदेशावर टीका केली आहे. भटकी कुत्री ही एक समस्या असली, तरी त्या समस्येवर उपाय शोधण्यासाठी अशा प्रकारे कारवाई करणे योग्य नव्हे असेच अनेकांचे मत आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या वर्षीसुद्धा हा विषय सर्वोच्च न्यायालयासमोर आला असताना एका न्यायाधीशानी थोडा वेगळा निर्णय दिला होता आणि भटक्या कुत्र्यांकडेसुद्धा सहानुभूतीने पाहणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले होते. पण सोमवारचा सर्वोच्च न्यायालयाचा जो निर्णय आहे त्याप्रमाणे राजधानी दिल्लीतील सर्व कुत्री पकडून त्यांना एखाद्या विशिष्ट आश्रयस्थानामध्ये पाठवले जाणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय दिलासा देणारा वाटत असला, तरी या निर्णयाला अनेक कंगोरे आहेत. कारण दीर्घकाळापासून भारतासारख्या देशामध्ये कुत्री आणि मानव यांचे सहजीवन सुरू आहे. सामान्य नागरिकांना भटक्या कुत्र्यांचा त्रास होतो याबाबत कोणतीही शंका नसली, तरी कुत्र्यांना संपूर्णपणे रस्त्यावरून बाजूला करून अन्यत्र हलवणे हा या समस्येवरील उपाय आहे का, याचा विचार केला जावा अशीच तज्ज्ञांची मागणी आहे. भटक्या कुत्र्यांची समस्या सोडवण्यासाठी इतर अनेक उपाय उपलब्ध आहेत. त्यामध्ये कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे, नसबंदी करणे किंवा लसीकरण करणे अशा अनेक गोष्टी करता येऊ शकतात. पण या सर्व गोष्टी बाजूला सारून जर कुत्र्यांनाच रस्त्यांवरून उचलून एखाद्या वेगळ्या आश्रयस्थानामध्ये ठेवले तर ती क्रूरता ठरेल असेच अनेकांचे मत आहे. गेल्या वर्षी एका प्रख्यात उद्योगपतीचा मृत्यू भटक्या कुत्रा चावल्यामुळे झाल्यानंतर हा विषय प्राधान्याने समोर आला होता. आता हा विषय चर्चेला आल्यानंतर गेल्या काही दिवसांमध्ये देशात अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांनी माणसांवर केलेल्या हल्ल्याच्या बातम्याही प्रसिद्ध होत आहेत. लहान मुलांना कुत्र्यांनी पळवणे किंवा त्यांच्यावर हल्ला करून त्यांना ठार मारणे किंवा भटक्या कुत्र्यांनी घेतलेल्या चाव्यामुळे रेबीजसारखा रोग होणे याची नेहमीच चर्चा होत राहते. काही वर्षांपूर्वी जेव्हा हा विषय चर्चेला आला होता तेव्हा कुत्र्यांची नसबंदी किंवा निर्बीजीकरण या विषयालासुद्धा विरोध करण्यात आला होता आणि तीसुद्धा प्राण्यांसाठी क्रूरता आहे असे काही जणांचे म्हणणे होते. पण ज्या प्रकारे रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत आहे ते पाहता संख्या नियंत्रित करण्यासाठी नसबंदी आणि निर्बीजीकरण हे उपाय आधुनिक काळामध्ये योग्य वाटू शकतात. अर्थात, जेवढी भटकी कुत्री आज रस्त्यांवर फिरताना आढळतात त्याच्या काही प्रमाणामध्ये तरी घराघरांमध्ये पाळीव श्वानसुद्धा असतात. पाळीव कुत्र्यांना जेवढ्या वैद्यकीय सोयी आणि सुविधा उपलब्ध होतात तेवढ्या त्या भटक्या कुत्र्यांना उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अनेक वेळा ह्या कुत्र्यांना व्यवस्थित खायलाही मिळत नाही, पाणी मिळत नाही आणि विविध प्रकारच्या रोगांशी सामना करावा लागतो. भारतामधील अनेक शहरांमधील रस्त्यावर जे फूड स्टॉल आहेत तेथील शिल्लक अन्नावरच अनेक वेळा या भटक्या कुत्र्यांची गुजराण होते. जर काही कारणाने या कुत्र्यांना अन्न उपलब्ध झाले नाही तर ती हिंसक होऊ शकतात. त्यातूनच कुत्र्यांनी माणसांवर हल्ले करण्याचे प्रकार वाढीस लागतात. साहजिकच पाळीव कुत्र्यांना ज्या प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध होतात त्याच प्रकारच्या सोयीसुविधा किमान अन्न, पाणी आणि योग्य औषधोपचार जर भटक्या कुत्र्यांना मिळाले झाले तर या विषयाची तीव्रता कमी होऊ शकते. कुत्र्यांचा त्रास कमी करण्यासाठी त्यांना संपूर्णपणे रस्त्यावरून उचलून अन्यत्र नेणे हा योग्य पर्याय असू शकत नाही. ह्या विषयाला जर पूर्णविराम मिळवायचा असेल तर विचारपूर्वक आणि संशोधन करूनच निर्णय घ्यावा लागणार आहे. अनेक पाश्चिमात्य देशांमध्ये किंवा अमेरिकेसारख्या मोठ्या देशांमध्ये रस्त्यावर भटकी कुत्री दिसत नाहीत हे वास्तव आहे. अशा देशांमध्ये भटक्या कुत्र्यांबाबत काय धोरण आहे आणि तेथील भटक्या कुत्र्यांचे नियोजन कसे केले जाते याचा विचार यानिमित्ताने करणे गरजेचे आहे.

## नटावदकर बालमंदिरात कृष्ण जन्माष्टमी साजरी

**प्रतिनिधी । नंदुरबार**

येथील शा.ज. नटावदकर बालमंदिरात कृष्ण जन्माष्टमीचा उत्सव साजरा करण्यात आला. सकाळी प्रार्थना सभेत भगवान श्रीकृष्णांची आरती करण्यात आली. शाळेच्या मैदानात दहीहंडीची खेळकर उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी दहीहंडी व बासरी सजवून आणली होती व विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या आकर्षक वेशभूषा परिधान केल्या होत्या. शिक्षकांनी भगवान कृष्णांच्या जीवनातील गोष्टी सांगितल्या आणि त्यांच्याकडून शिकण्यासारख्या गोष्टींवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन श्रीकृष्ण जन्माष्टमीचा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला.

## पाचकंदीलसह आग्रा रोडवरील भाजी विक्रेत्यांना जेबी रोडवर तात्पुरती जागा

**प्रतिनिधी । धुळे**

शहरातील पाचकंदीलसह आग्रा रोडवरील भाजीपाला विक्रेत्यांनी पुढील चार ते पाच महिने जमनालाल बजाज रोडवर निश्चित करून दिलेल्या जागेत व्यवसाय करावा. या चार-पाच महिन्यांत पाचकंदीलमधील जुन्या फ्रूट मार्केटच्या जागेवर नवीन मार्केटचे काम सुरू करून तेथे किमान एक मजला उभारून तेथे त्यांना व्यवसायासाठी ओटे-गाळे देण्याचा सर्वमान्य निर्णय घेण्यात आला. या संदर्भात आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

शहरातील पाचकंदीलसह आग्रा रोडवरील भाजी विक्रेत्यांना जागेच्या प्रश्नावर आज येथील जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बैठक झाली. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, आ. अनुप अग्रवाल, महापालिका आयुक्त अमिता दगडे पाटील,



निवासी उपजिल्हाधिकारी गंगाराम तळपाडे, तहसीलदार (महसूल) प्रवीण चव्हाणके, सा.बां.वि.चे कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, महापालिकेचे सहआयुक्त किशोर सुडके, शहर वाहतूक शाखेचे पोनि ज्ञानेश्वर वारे, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दीपक पाटील, आझादनगरचे पोलिस निरीक्षक निवृत्ती पवार, देवपूरचे पोलिस निरीक्षक समाधान वाघ, चाळीसगाव रोड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्री. घुसळकर, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, धुळे व्हेजिटेबल असोसिएशन आणि कमिशन एजंट संघटनेचे अध्यक्ष, छत्रपती संभाजीराजे लोटगाडी युनियनचे अध्यक्ष, धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक महादेव परदेशी, भाजीपाला विक्रेते प्रतिनिधी प्रमोद चौधरी, मोठाभाऊ चोळके, बंटी चौधरी, नितीन वराडे, सुनील माळी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विसपुते म्हणाल्या, की विक्रेत्यांना जागा ठरवून दिली आहे, तर तेथे काही दिवस व्यवसाय करण्यास हरकत नाही. कारण रस्त्यावर व्यवसाय करायचा म्हटल्यास वाहतूक खोळंबा, गर्दी आदी अडचणी उद्भवतात. यात काहीही चुकीचे घडले, तर त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर येते. त्यामुळे सर्वांनाच समजदारीची भूमिका घ्यावी लागेल. आपल्याकडे पर्यायी जागा असतील तर त्या सुचवा. तेथे चांगले मार्केट तयार करून देऊ. मात्र, रस्ते ठप्प होऊ देणार नाही. आज सगळे जण सकारात्मक आहेत. आमदार अग्रवाल म्हणाले, की पाचकंदीलला जे फ्रूट मार्केट आहे ते पाडून तेथे चार-पाच महिन्यांत नवीन मार्केट बांधण्याची हमी देतो. या चार महिन्यांत या नवीन मार्केटमध्ये एक मजला बांधून तेथे भाजी विक्रेते आणि फळ विक्रेत्यांना तात्पुरत्या स्वरूपात दुकाने उपलब्ध करून देऊ. यानंतर स्वतंत्र भाजी मार्केट बांधून तेथे सर्व भाजीपाला विक्रेत्यांना स्थलांतरित करता येईल. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात किमान चार-पाच महिने जमनालाल बजाज रोडवर सर्व भाजीपाला विक्रेत्यांना व्यवसाय करू द्या.

## क्रिकेटमध्ये शॉर्ट रन संदर्भात नवा नियम लागू

**वृत्तसंस्था । मुंबई**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) देशांतर्गत क्रिकेटमध्ये शॉर्ट रन संदर्भात नवा नियम लागू केला आहे.

या नव्या नियमांनुसार, जर एखाद्या फलंदाजाने मुद्दाम शॉर्ट रन घेतल्यास, क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाच्या कर्णधाराला कोणता फलंदाज स्ट्राइकवर ठेवायचा हे ठरविण्याचा अधिकार मिळेल.

शॉर्ट रन घेण्यामागील कारण आणि नवे नियम क्रिकबजच्या अहवालानुसार, फलंदाज मुद्दाम शॉर्ट रन घेतात जेणेकरून अनुभवी फलंदाज स्ट्राइकवर येऊ शकेल.

## विसरवाडी परिसरात बिबट्याचा मुक्तसंचार सीसीटीव्हीमध्ये कैद


**प्रतिनिधी । नवापूर**

तालुक्यातील विसरवाडीपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या बालअमराई, नांगीपाडा आणि कन्हाळा गावांच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याचा वावर सुरू आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या बिबट्याने अनेक वासरे, बकऱ्या, कुत्रे आणि कोंबड्या फस्त केल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याची मागणी होत आहे. वनविभागाने बाल अमराई रस्त्यालगत पिंजरा लावला आहे. मात्र बिबट्या त्यात अडकला नसून दुसऱ्या मार्गाने फिरताना राईस मिलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. चिंचपाडा वनक्षेत्र विभागाचे अधिकारी बेडसे, सूर्यवंशी, गावीत व चालक चमारा गावीत यांचे पथक परिसरात गस्त घालत आहे. तरीही नागरिकांनी रात्री बाहेर न पडण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.

## बोधकथा

### भीती



अहमदाबादच्या महात्मा गांधी सायन्स लॅब्रोरेटरीमध्ये काही विद्यार्थी प्रयोग करत होते. प्रयोगशाळा त्या दिवसांत प्रख्यात वैज्ञानिक साराभाई यांनी नुकतीच सुरू केली होती. प्रयोगादरम्यान दोन मुलांकडून मोठी चूक झाली. ते दोघे खूपच घाबरले. आपल्याल आता मोठी शिक्षा भोगावी लागेल, असे त्यांना वाटू लागले. ते भीत-भीतच साराभाईंकडे गेले. साराभाईंनी त्यांना घाबरलेले पाहून विचारले, का रे, काय झाले? इतके घाबरलात का? एक विद्यार्थी म्हणाला, सर, इलेक्ट्रॉनिक मोटर जळाली. त्यात जरा जास्तच वीज गेली. हे ऐकून साराभाई भयंकर संतापले. पण नंतर त्यांनी स्वत:ला सावरले आणि म्हणाले, इतकंच! एवढ्यासाठी घाबरलात? प्रयोग करताना चुका ह्या होणारच. चुकल्याशिवाय कळणार कसं? पण पुढच्यावेळी प्रयोग करताना अधिक दक्षता घ्या. त्यामुळे नुकसान टळू शकतं. हे ऐकून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर विद्यार्थी भारावून गेले. ते साराभाईंपुढे नतमस्तक झाले. वास्तविक, जी मोटार अशीच विद्यार्थ्यांच्या चुकींमुळे जळाली होती, ती खूपच महागडी होती. त्या दिवसांत बाजारात उपलब्ध देखील नव्हती. तरीही साराभाई विद्यार्थ्यांवर ओरडले नाहीत की बोल लावले नाहीत. उलट त्यांची भीती दूर केली. कारण भविष्यात प्रयोग करताना ते घाबरणार नाहीत. प्रयोग करताना त्यांनी प्रोत्साहित केलं.

**तात्पर्य :- भीतीमुळे माणसे पुढे सरकत नाहीत, ती मागेच राहतात.**

## राशिभविष्य

**मेष :** आरोग्याच्या दृष्टिकोनातून आजचा दिवस थोडा त्रासदायक असू शकतो. तुमच्या खाण्यापिण्यात अधिक संयम ठेवा. मानसिक ताण टाळण्यासाठी, स्वतःला कामात व्यस्त ठेवा.

**वृषभ :** आज प्रेमसंबंधांमध्ये कमी अनुकूल परिस्थिती असेल. प्रेम प्रकरणात अचानक नकारात्मक परिस्थिती उद्भवू शकते.

**मिथुन :** आज, काही ज्येष्ठ नातेवाईकांच्या मध्यस्थीने वडिलोपार्जित मालमत्तेचा प्रश्न सोडवला जाईल. ज्यामुळे तुम्हाला आर्थिक लाभ मिळेल आणि तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**कर्क :** आर्थिक बाबींमध्ये विचारपूर्वक निर्णय घ्या. घाईघाईत भांडवल गुंतवू नका. आज प्रेमसंबंधातील तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.

**सिंह :** तुमच्या कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्याकडून मार्गदर्शन आणि संगत मिळाल्यावर तुम्ही लगेच भूत व्हाल.

**कन्या :** तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. आरोग्य चांगले राहील. तुम्ही सकारात्मक उर्जेने परिपूर्ण असाल.दुसऱ्याशी वाद घालणे टाळा.

**तुळ :** आज वैवाहिक जीवनात जवळीकता राहील. अन्यथा हा वाद मारामारीचे रूप घेऊ शकतो, तुम्हालाचा त्रास होईल.

**वृश्चिक :** आज, मालमत्तेशी संबंधित वाद लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. सकारात्मक विचारसरणीमुळे नात्यात अधिक गोडवा येईल.

**धनु :** आज पूर्ण होत आलेल्या कामात अडथळे येतील. पण काही प्रयत्नांनी परिस्थिती अनुकूल होऊ लागेल. ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल.

**मकर :** आज कामाच्या ठिकाणी जास्त धावपळ झाल्यामुळे शारीरिक आणि मानसिक त्रास होऊ शकतात. आज तुम्ही राजकारणात तुमच्या विरोधकांना क्षमा करण्यात यशस्वी व्हाल. जुन्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल.

**कुंभ :** उत्पन्नाचे स्रोत वाढतील. व्यवसाय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना त्यांच्या सहकाऱ्यांसोबत अधिक समन्वय निर्माण करावा लागेल. आज आर्थिक व्यवहारात अधिक काळजी घ्या. जास्त पैसे खर्च होऊ शकतात.

**मीन :** आज कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. तुमच्या परिस्थिती लक्षात घेऊन भांडवली गुंतवणुकीबाबत अंतिम निर्णय घ्या. आर्थिक बाबींचा आढावा घेऊन प्लान आखा. कोणाच्याही बोलण्यात अडकू नका.

## एचएसआरपी नंबरप्लेटसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**वृत्तसंस्था । मुंबई**

राज्यातील वाहनधारकांसाठी एक महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. परिवहन विभागाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट्स बसवण्याची अंतिम मुदत वाढवली आहे. यापूर्वी ३१ मार्च २०२५ आणि नंतर १५ ऑगस्ट २०२५ अशी मुदत देण्यात आली होती. आता पुन्हा मुदतवाढ देत ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे लाखो वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

परिवहन विभागाने ही मुदतवाढ देण्यामागे अनेक कारणे असल्याचे स्पष्ट केले आहे. एचएसआरपी बसवण्यातील प्रलंबित प्रक्रिया, फिटमेंट केंद्रांवरील नियुक्ती उपलब्धतेत विलंब, ग्रामीण भागातील केंद्रे उशिरा सुरू होणे, काही केंद्रे बंद होणे आणि नागरिकांच्या सततच्या मागण्या यांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. या सर्व अडचणी लक्षात घेता, वाहनधारकांना पुरेसा वेळ मिळावा यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्य परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी जारी केलेल्या आदेशात स्पष्ट निर्देश दिले आहेत की, १ डिसेंबर २०२५ पासून विशेष अंमलबजावणी पथके एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर कठोर कायदेशीर कारवाई करतील.

मात्र, ज्या वाहन मालकांनी ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी फिटमेंटसाठी अपॉइंटमेंट निश्चित केली असेल, त्यांना त्यांच्या नियोजित तारखेपर्यंत कारवाईतून सूट मिळेल. यामुळे वाहनधारकांना शेवटच्या क्षणापर्यंत संधी आहे, परंतु त्यानंतर कोणतीही सवलत मिळणार नाही.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – राजेंद्र राधाकिसन शर्मा (मोबा. – ९४२२७८४३३६) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# जळगाव महानगर

epaper.shauryamarathi.com | जळगाव | सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात

### आजाद नगरात शिलाई मशीन वाटप



**जळगाव ।** खतिजा टेलरिंग कोर्स संस्थेमार्फत महिल व विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट वाटप तर महिलांना शिलाई मशीनचे वाटप माजी उपमहापौर कुलभूषण पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे प्रमुख आबिद खान, रोशन पिंजारी, अहमद ठेकेदार, माजी नगरसेवक आबा कापसे, जाकीर खान, सामाजिक कार्यकर्ते आसीफ खान, शरीफ खान, विनोद निकम आदी उपस्थित होते.

### मनवासेचा पहिला रिक्षा थांबा सुरू

**जळगाव ।** महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेचा पहिला रिक्षा थांबा रेल्वे स्टेशन परिसरात कार्यान्वित झाला. यानिमित्त वीस रिक्षांना महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेचे ओळखपत्रीय स्टिकर लावण्यात आले. कार्यक्रमाला माजी आ.ॲड. जयप्रकाश बाविस्कर, जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे उपस्थित होते. त्यांच्याहस्ते रिक्षांना स्टिकर लावून वाहतूक सेनेचा उपक्रम सुरू करण्यात आला. यावेळी उपमहानगराध्यक्ष ललित शर्मा, चेतन पवार, श्रीकृष्ण मेंगडे, राजेंद्र निकम, प्रकाश जोशी, सतीश सैंदाने, संजय मोती, साजन पाटील, विकास पाथरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### आयएमए जळगावतर्फे अवयवदात्यांचा गौरव

**जळगाव ।** येथील आयएमए जळगावतर्फे जागतिक अवयवदान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सर्व धर्मगुरूंनी अवयव दानातून इतर गरजूंना जीवनदान देणे गरजेचे आहे असा संदेश दिला. आयएमए हॉलमध्ये अवयवदात्यांचा गौरव सोहळ्यात एकाच व्यासपीठावरून सर्व धर्मगुरूंनी मार्गदर्शन केले. यावेळी अवयवदाते ज्योती अनिल झोपे, संगीता बबन लोंढे, स्वाती धनराज मंडलिक, छाया रवींद्र पाटील, रूपाली राजेंद्र वाणी, राकेश गावंडे, संगीता सोनवणे, कल्पना रमेश सोनवणे, मंगला कांतीलाल गांधी, सतीश पंजाबी यांचा कुटुंबीयांसह स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# बचत गटांना बाराही महिने उत्पन्न मिळवून देणारे स्त्रोत उपलब्ध होतील

**● पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला विश्वास; महिला व बालकल्याण भवनचे लोकार्पण**

**प्रतिनिधी । जळगाव**

शासन महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असून, जिल्हा नियोजनातून जिल्ह्यात अकरा बहिणाबाई मार्ट उभारण्याची कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे महिला बचत गटांना हक्काची शाश्वत जागा मिळणार असून १२ महिने उत्पन्न मिळवून देणारे स्रोत उपलब्ध होतील, असा विश्वास पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला.

महाबळ रोडवर बांधलेल्या महिला व बालकल्याण भवनचे लोकार्पण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. या वेळी खा. स्मिता वाघ, आ.राजूमामा भोळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, कार्यकारी अभियंता आर.बी. पाटील, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी रफिक तडवी यांसह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, महिलांच्या सक्षमीकरणासाठी फक्त तोंडी बोलून नाही तर कृतीशील काम करून महिलांच्या प्रगतीसाठी अत्यंत सुबक आणि नावीन्यपूर्ण महिला व बालकल्याण भवन जिल्हा नियोजनच्या सहा कोटी रुपयांच्या निधीतून बांधण्यात आले आहे. राज्यात रोल मॉडेल ठरेल असे हे बांधकाम असून, आता महिला व बालकांच्या विकासासाठी कार्यरत असलेली सात विभाग एका छताखाली जोमाने काम करतील, असा विश्वास पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला. जागतिक महिला दिनी या इमारतीच्या भूमिपूजनाची कुदळ पालकमंत्र्यांच्या हस्ते मारली गेली होती, तर केवळ अठरा महिन्यांत हे सुसज्ज भवन उभे राहिले. लोकार्पणही त्यांच्या हस्ते होणे, ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.



**■ सात कार्यालये कार्यान्वित...**

या सुसज्ज भवनामध्ये एकूण सात कार्यालये कार्यान्वित झाली आहेत. यात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बालविकास प्रकल्प अधिकारी जळगाव शहरी प्रकल्प, बालविकास प्रकल्प अधिकारी दक्षिण प्रकल्प, जिल्हा महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी कक्ष, महिला सक्षमीकरण केंद्र आणि चाईल्ड लाईन या कार्यालयांचा समावेश आहे.

**भवन साकारणाऱ्या कारागिरांचा गौरव**

पालकमंत्री गुलाबराव पाटील, खा. स्मिता वाघ, आ. राजूमामा भोळे यांच्याहस्ते हे सुंदर भवन ज्या कारागिरांच्या कौशल्यपूर्ण हातानी साकारले त्या सर्वांचा विशेष गौरव यावेळी करण्यात आला.

# मोबाईलवरील गाणे बंद केल्याने मुलीसह पत्नीला मारहाण




**प्रतिनिधी । जळगाव**

मोबाईलवरील गाणे बंद केल्याच्या रागातून अकरावीत शिकणाऱ्या स्वतःच्या मुलीला कुकरच्या झाकणाने मारहाण तर पत्नीला काचेचा ग्लास फोडून जखमी केल्याची घटना शुक्रवार, दि.१५ रोजी चंदूअण्णा नगरात घडली. या प्रकरणी समाधान विजयसिंग पाटील (वय-३२, रा. चंदूअण्णा नगर) याच्याविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, समाधान पाटील हा मद्यपान करून घरी आला आणि त्याने पत्नीच्या मोबाईलवर गाणे लावले. त्यावेळी त्याची अभ्यास करणारी मुलगी प्राप्ती पाटील हिने वडिलांना गाणे बंद करण्यास सांगितले. मात्र, वडिलांनी ऐकले नाही, म्हणून प्राप्तीने स्वतःच मोबाईलवरील गाणे बंद केले. या क्षुल्लक कारणावरून संतप्त झालेल्या समाधानने काचेचा ग्लास फोडून पत्नी जागृती पाटील हिला मारहाण करण्यास सुरुवात केली. आईला मारहाण होताना पाहून मुलगी प्राप्ती तिला सोडवण्यासाठी पुढे सरसावली. तेव्हा पित्याने कुकरच्या झाकणाने तिच्या हातावर मारून तिला जखमी केले.

दोघांना मारहाण केल्यानंतर समाधान पाटील हा त्याच्या मूळ गाव कल्याणेहोळ येथे पळून गेला. या प्रकरणी जागृती पाटील यांच्या फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दलिचंद जैन यांचा 'ब्रज मधुकर अर्चना लाईफ टाईम अचिव्हमेंट' पुरस्काराने गौरव



**प्रतिनिधी । जळगाव**

येथील जैन समाजाने आपल्या सामाजिक आणि धार्मिक कार्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडली आहे. जळगावच्या जैन संघ एकतेचा भारतात वेळोवेळी गौरवोल्लेख होतो. या एकतेसाठी, समाज कार्यासाठी तसेच साधु-संतांच्या सेवेत अग्रणी व्यक्तीमत्त्व संघपती सेवादास दलिचंद जैन यांना 'ब्रज मधुकर अर्चना लाईफ टाईम अचिव्हमेंट' पुरस्काराने गौरविण्यात आले. चेन्नई येथील जय ब्रज मधुकर समितीतर्फे जैन हिल्स येथे आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

व्यक्तीच्या सामाजिक, धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल सदर पुरस्कार प्रदान करण्यात येतो. कार्यक्रमात माजी मंत्री सुरेश जैन यांना समाज, संस्कृती, परंपरा आणि सेवा यातील योगदानाबद्दल 'मारवाड रत्न' पुरस्काराची घोषणा करून तो त्यांना लवकरच प्रदान करण्यात येणार आहे. हा भव्य समारंभ जैन हिल्स येथील आकाश प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. प्रथम युवाचार्य बहुश्रुत, पंडितरत्न प.पु. मिश्रीमल जी म.सा. मधुकर यांच्या अंत्येवासीनी सुशिष्या काश्मीर प्रचारिका, राजगुरुमाता प.पु. उमरावकुँवर जी अर्चना यांच्या १०३ व्या जन्मोत्सवानिमित्त हा विशेष कार्यक्रम साजरा झाला.

**■ समाजात, संघात एकता आवश्यक...**

माजी खा.ईश्वरलाल जैन म्हणाले की, जळगाव श्री संघाचे वैशिष्ट्य म्हणजे विविधतेतून एकता. जैन धर्मातील सर्व पंथ एकत्र येऊन एकच महावीर जयंती साजरी करतात, ज्यामुळे समाजाची आदर्श एकता दिसून येते. तर सत्काराला उत्तर देताना दलिचंद जैन म्हणाले की, वाकोदसारख्या छोट्या गावातून आमचा परिवार आला. हा विकास केवळ शिक्षणामुळे शक्य झाला. समाजात आणि संघात एकता असणे अत्यंत आवश्यक आहे. मतभेद असू शकतात, परंतु मनभेद नसावेत. कोणतेही कार्य यशस्वी होण्यासाठी एकमेकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे, असे सांगून हा पुरस्कार मी माझ्या प्रत्येक जैन संघ सदस्याला अर्पण करतो, असेही ते यावेळी म्हणाले.

### नाट्यगृह देखभालीसाठी चालढकल

**जळगाव ।** बालगंधर्व सभागृहात अजित पवारांनी जळगावात नाट्यगृहाची उभारणी करावी म्हणून सूचना दिल्या आणि तत्कालीन पालकमंत्री गुलाबराव देवकर यांनी नाट्यगृहाची उभारणी केली. त्यानंतर संभाजीराजे नाट्यगृह केशव स्मृती प्रतिष्ठानने चालवायला घेतले. मात्र, या नाट्यगृहाच्या देखभाल, दुरुस्तीचा खर्च आवाक्याबाहेर जात असल्याने केशव स्मृती प्रतिष्ठाननेही नाट्यगृह चालविण्यास नकार दिला असून तसे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.



**जळगाव ।** शहरातून जाणाऱ्या महार्गावरील मानराज पार्कजवळ एक भरधाव ट्रक महामार्गाच्या मधोमध असलेल्या डिव्हायडरवर चढला. यात ट्रक आणि डिव्हायडरचे नुकसान झाले. दरम्यान, या ठिकाणी डिव्हायडरवर वाहने चढून अपघात होण्याचे प्रकार नित्याचेच झाले आहेत. त्या ठिकाणी काही उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# देशाच्या आर्थिक विकासासाठी संशोधन महत्वाचे : सुजय जाधव

**प्रतिनिधी । जळगाव**

देशाच्या आर्थिक विकासासाठी संशोधन महत्वाचे ठरते, असे प्रतिपादन मुंबई येथील टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च केंद्राचे संशोधक सुजय जाधव यांनी केले.



डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयातील संशोधन विकास समिती, संशोधक प्रेरणा समिती आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'संशोधनाकडे वळा' या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.व्ही.जे. पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विज्ञान परिषदेच्या जळगाव शाखेचे सचिव प्रा.दिलीप भारंबे, कोषाध्यक्ष शशिकांत नेहेते, उपप्राचार्य डॉ. पी.एन. तायडे उपस्थित होते. विद्यार्थिनींना संशोधन विषयाची आवड निर्माण व्हावी व त्यातून समाजपयोगी संशोधन व्हावे, या उद्देशान या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सुजय जाधव यांनी, सेमिनारद्वारे संशोधनाचा अर्थ, हेतू आणि त्याची गरज, संशोधन समस्या निवड, संशोधनाची सामाजिक उपयुक्तता, संशोधकाची क्षमता व गुणवैशिष्ट्ये आदी मुद्यांवर मार्गदर्शन केले. तसेच संशोधनासाठी उपलब्ध शिष्यवृत्ती संदर्भात माहिती दिली. प्राचार्य डॉ. व्ही. जे. पाटील यांनी विद्यार्थिनींना संशोधनाचे महत्व पटवून दिले. सूत्रसंचालन डॉ. शिला राजपूत यांनी केले.

# नूतन मराठा महाविद्यालयात रंगली 'संविधान जागर' करंडक स्पर्धा


**प्रतिनिधी । जळगाव**

स्वातंत्र्य दिनानिमित्त विश्वासराव भालेराव प्रतिष्ठान आणि नुतन मराठा महाविद्यालय जळगाव आयोजित का. राजेंद्र भालेराव स्मृती संविधान जागर करंडक आंतर शालेय आणि आंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संविधान पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. यात शालेय गटात वैष्णवी पाटील तर आंतर महाविद्यालयीन गटात कावेरी नेरकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

संविधानाचे महत्व समाजामध्ये रुजावे यासाठी, या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक जयसिंग वाघ यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.एल.पी. देशमुख उपस्थित होते. सुश्मिता भालेराव व उदय सपकाळे यांनी परिक्षक म्हणून काम पाहीले. या कार्यक्रमाला विलास यशवंते, कुलदीप भालेराव उपस्थित होते.

स्पर्धेत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सुत्रसंचलन शरद भालेराव यांनी केले तर प्रशांत सुरवाडे यांनी आभार मानले. शेवटी सर्व उपस्थितांनी स्वातंत्र्य दिनाची शपथ घेतली.

**■ मानवी मुलभूत अधिकारावर केले सादरीकरण...**




स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी संविधानाने दिलेल्या मानवी मुलभूत अधिकार या विषयावर सादरीकरण केले. यात प्रथम पारितोषिक वैष्णवी पाटील, द्वितीय काव्या फेगडे, तृतीय काव्या पवार, उत्तेजनार्थ दिशा सूर्यवंशी आणि प्रथमेश गौरव या विद्यार्थ्यांनी पटकावले तर आंतर महाविद्यालयीन गटातून कावेरी नेरकर यांनी प्रथम तर आलिया बी अमजद यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. स्पर्धेतील सर्वात लहान स्पर्धक चार वर्षाची प्रेरणा राजेंद्र बावस्कर हिला विशेष पारितोषिक देण्यात आले.

### पावणे तीन लाखांचे दागिने लांबविले

**जळगाव ।** वरील मजल्यावर दाम्पत्य झोपलेले असताना चोरट्यांनी खालच्या खोलीचा दरवाजा तोडून कपाटातील दोन लाख ८१ हजार १०० रुपये किमतीचे पाच तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना १४ रोजी मध्यरात्री द्रौपदी नगरात घडली.

याप्रकरणी जिल्हा पेठ पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मुकूंद गोसावी यांचा पालकमंत्र्यांच्याहस्ते सन्मान

**प्रतिनिधी । जळगाव**

सामजिक बांधिलकी जोपासत आरोग्य, रक्तदान सेवेत निस्वार्थ भावनेने अखंड सेवारत असलेले मुकुंद गोसावी यांचा स्वातंत्र्यदिनानिमित्त आरोग्य संजीवनी अभियान सप्ताहात सहभाग घेतल्याबद्दल पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रांताधिकारी विनय गोसावी, गोविंद पाटील, नवलराजे पाटील, सीए.हितेश आगीवाल, डॉ.आनंद जैन, डॉ.योगेश पाटील, डॉ.जयेश कुमार, वैभव निकुंभ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



**■ शारीरिक व्यंगाला न जुमानता रक्तदान...**

मुकुंद गोसावी हे आपल्या शारीरिक व्यंगाला न जुमानता विविध मोफत आरोग्य, रक्तदान शिबीर तसेच राष्ट्रीय कार्यात स्वयंस्फूर्त सहभागी होत असतात. मुकूंद गोसावी यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेवून पालकमंत्र्यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. त्यांचा या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# हरिजन कन्या छात्रालयाने फोडली युवतींची दहीहंडी

**● रोप मल्लखांब, चित्तथरारक कसरतींनी वेधले लक्ष; ११ संघातील ५०० गोपिकांचा सहभाग**

**प्रतिनिधी । जळगाव**

रोप मल्लखांब, चित्तथरारक कसरती आणि सांस्कृतिक नृत्याच्या कार्यक्रमांतून जळगावच्या गोपिकांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा आनंद द्विगणित केला. सोबतीला शौर्यवीर, पेशवा, वज्रनाथ ढोलपथकातील ४१५ वादकांनी परिसर दणाणून सोडला. या जल्लोषपूर्ण वातावरणात गोपिकांचे मानवी मनोरे जळगावकरांचे लक्ष वेधून घेत होते. अखेर उत्तर महाराष्ट्रातील एकमेव असलेल्या युवतींची दहीहंडी फोडण्याचा मान हरिजन कन्या छात्रालय या गोपिकांच्या पथकाने मिळविला. त्यांना विशेष पारितोषिकाने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन व युवाशक्ती फाऊंडेशनतर्फे सागर पार्क मैदानावर युवतींच्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खा.स्मिता वाघ, आ.राजूमामा भोळे, जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, ज्योती जैन, जि.प.च्या सिईओ मिनल करनवाल, पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, ऐश्वर्या रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, डीवायएसपी संदीप गावित, अग्रणी बँकेचे सुनील दोहरे, माजी महापौर विष्णू भंगाळे, जेडीसीसी बँकचे संचालक अरविंद देशमुख, गोदावरी फाऊंडेशनच्या डॉ.केतकी पाटील, युवतींच्या दहिहंडी समितीच्या अध्यक्ष डॉ. कल्याणी नागूलकर, प्रा.शमा सराफ, निलम जोशी, अनिता पाटील, यामिनी कुळकर्णी, सोनाली महाजन, चेतना नन्नवरे, लिना पवार, डॉ. हेमांक्षी वानखेडे, श्रीया कोकटा उपस्थित होते. सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दहिहंडी पूजन करण्यात आले. दरम्यान दहिहंडी फोडणाऱ्या गोपिकांच्या पथकाला चषकाने सन्मानित करण्यात आले. यासोबतच इतर सहभागी झालेल्या संघानासुद्धा गौरविण्यात आले.



यावेळी छाया बोरसे, मंजुषा भिडे, कामिनी धांडे, छाया चिरमाडे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

दहीहंडी पथकात यंदा प्रथमच युवतींच्या ११ संघातील ५०० गोपिकांनी सहभाग घेतला. दहीहंडीत विविध चित्तथरारक कवायती, रोप मल्लखांब, सांस्कृतिक नृत्य, प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. शौर्यवीर, पेशवा, वज्रनाद या ढोलपथकातील ४१५ वादकांनी परिसर दणाणून सोडला होता.

# रोटरी क्लबतर्फे एनसीसी ऑफीसर्स, विद्यार्थ्यांचा गौरव

**प्रतिनिधी । जळगाव**

रोटरी क्लब जळगावतर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात एनसीसी ऑफिसर्स व राष्ट्रीय पथ संचालनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा माजी अध्यक्षांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

याप्रसंगी अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव पंकज व्यवहारे उपस्थित होते. सत्कारार्थीमध्ये एनसीसीचे सुभेदार रामकिशन, हवालदार राजू गायकवाड, वरिष्ठ लिपिक गौरव निमजे, एनसीसी कॅडेट गुणवंत खाडे, अरिफ पिंजारी, खुश बाविस्कर, उदय पाटील, साक्षी सिंग यांचा समावेश होता. त्यानंतर रोटरी क्लब जळगावच्या सारेगम समूहाच्या कलावंतांनी विविध देशभक्तीपर गीते सादर केले. निवेदन व संचालन सुबोध सराफ यांनी केले. गायक कलावंतांमध्ये नित्यानंद पाटील, कॅप्टन मोहन कुलकर्णी, राजेश वेद, ॲड.आनंद मुजुमदार, सुबोध सराफ, स्मिता पाटील, विशाखा पोतदार, वृषाली जोशी, ॲड.कीर्ती पाटील, आदिती कुलकर्णी, खुश बाविस्कर यांचा समावेश होता.

# चिंचोलीचे मेडिकल हब खान्देश विकासाच्या टप्प्यात ठरणार अभिमानाची बाब

## • उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन; शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या प्रकल्पाची पाहणी

**प्रतिनिधी । जळगाव**

तालुक्यातील चिंचोली येथील पूर्णत्वास जात असलेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची इमारत हि अत्यंत अत्याधुनिक व सुसज्ज अशी आता लवकरच लोकांच्या सेवेत पुढील काळात सुरु होणार आहे. हि निश्चितच जळगावसाठीच नव्हे तर खान्देशच्या विकासाच्या टप्प्यात अभिमानाची बाब ठरणार आहे. यासाठी मेहनत घेणाऱ्या प्रकल्प विकासकांसह वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे कौतुक आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री अजित पवार यांनी केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या चिंचोली ता. जळगाव येथील प्रस्तावित नवीन इमारतींची उभारणी अंतिम टप्प्यात आली आहे. या इमारतींची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे जळगाव दौऱ्यावर रविवारी दि. १७ ऑगस्ट रोजी आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, खा. स्मिता वाघ, माजी मंत्री आ. अनिल पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकुर, उपअधिष्ठाता डॉ.मारुती पोटे, डॉ. धर्मेंद्र पाटील, प्रशासकीय अधिकारी डॉ. जितेंद्र



सुरवाडे व संजय चौधरी उपस्थित होते.

सुरुवातीला ना. अजित पवार यांचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर उपमुख्यमंत्री पवार यांना अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची प्रतिकृतीद्वारे पूर्ण प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. ना. अजित पवार यांनी प्रकल्पाचे कौतुक करून प्रकल्प लवकर पूर्णत्वास आणून वैद्यकीय महाविद्यालय पुढील काळात स्थलांतरित होईल अशी आशा व्यक्त केली. यानंतर त्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांच्या रचना प्रत्यक्ष पाहणी करून समजून घेतल्या. तर एका चित्रफितीद्वारे संपूर्ण मेडिकल हबची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहिली.

अतिशय सुंदर असे महाविद्यालय, रुग्णालय व त्याचा परिसर बनत असल्याचे पाहून त्यांनी प्रकल्प विकासक यांचे कौतुक केले. सदर मेडिकल हबची हि वास्तू निर्माणाधीन असल्याने काही ठिकाणी फिनिशिंगबाकी आहे. ते काम दर्जात्मक व चांगल्या पद्धतीने करावे, अशा सूचना प्रकल्प विकासक कंपनी एचएससीसी व न्याती कन्स्ट्रक्शन यांना उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या. ना. गिरीश महाजन म्हणाले की, जिल्ह्यातील आरोग्य विकासासाठी मेडिकल हबचे पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरताना पाहून मनस्वी आनंद होत आहे.

आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले कौतुक पाहून नक्कीच विकासकामांबाबत समाधान लाभत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी यांचेसह मेडिकल हबचा प्रकल्प तयार करीत असलेले एचएससीसी कंपनीचे महाप्रबंधक बी. एस. कांबळे, उपमहाप्रबंधक एस. के. जैन, न्याती कन्स्ट्रक्शनचे मॅनेजिंग डायरेक्टर जगदीश ओटी, अधीक्षक अभियंता शिवाजी पिंगळे, गणेश घोले, वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक अख्तर दफेदार आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### २२ दिवसांच्या खंडानंतर श्रावणसरी बरसल्या

**अमळनेर ।** मागील २२ दिवस पावसाचा खंड पडल्यामुळे पिके करपून गेली असून शेतकरी आर्थिकदृष्ट्या उध्वस्त झाले आहेत. शासनाने तात्काळ लक्ष देऊन शेतकऱ्यांना हेक्टरी किमान दहा हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी नेते प्रा. सुभाष पाटील यांनी केली आहे. मका, कापूस, सोयाबीन, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी यांसारख्या सर्वच पिकांची अवस्था बिकट झाली होती.

### आठ फूट लांबीचा अजगर जंगलात सोडला

**भुसावळ ।** वरणगाव शहरातील प्रतिभा नगर परिसरात रफाकद मशीद जवळ आठ ते नऊ फुट लांबीचा अजगर (पायथॉन) जातीचा साप आढळून आला. घरासमोर अजगर दिसल्याने परिसरातील रहिवासी भयभीत झाले. नागरिकांनी तात्काळ सर्पमित्र सचिन कदम यांना संपर्क साधला. त्यानंतर सर्पमित्र सचिन कदम, विजय सोनार, शुभम फालक, रेहान शेख व अजय धनगर यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली.

# अनुकंपा तत्वावर महिलेला दहाव्याच दिवशी नोकरी

**प्रतिनिधी । पाचोरा**

येथील रहिवासी व जळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षकांची सहकारी पतपेढी, मुख्य कार्यालय पारोळा येथे कार्यरत कर्मचारी प्रदीप वसंत वाघ यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. प्रगती पॅनलचे अध्यक्ष व अमळनेरचे गटशिक्षणाधिकारी रावसाहेब मांगो पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटीचे अध्यक्ष सचिन युवराज वाघ, उपाध्यक्ष मनोज प्रकाश पाटील व संचालक मंडळाने एक आदर्श निर्णय घेतला, असून गंधमुक्ती व उत्तरकार्याच्या दिवशीच, मयत कर्मचारी कै. प्रदीप



वाघ यांच्या पत्नी ग.भा. वर्षा प्रदीप वाघ यांना अनुकंपा तत्वावर नोकरीचा आदेश देण्यात आला.

पाचोरा येथील महालपुरे मंगल कार्यालयात १४ ऑगस्ट २०२५ रोजी माजी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब पाटील, सोसायटीचे चेअरमन सचिन वाघ, उपाध्यक्ष मनोज पाटील, संचालक भागवत हाडपे, प्रवीण पाटील, अनिल पाटील, अशोक इसे, गटशिक्षणाधिकारी समाधान पाटील यांच्या हस्ते आदेश देण्यात आला. या प्रसंगी माजी चेअरमन अनिल एकनाथ पाटील, राजेंद्र ठाकरे, जतनसिंग राजपूत, केंद्रप्रमुख कैलास देवरे, चंद्रकांत मोराणकर, शांताराम वानखेडे, खाजगी पतसंस्थेचे संचालक राकेश पाटील, राजेंद्र भिमराव पाटील, विपीन वसंतराव पाटील, विलास भास्कर पाटील, राजीव पद्ये, जितेंद्र वानखेडे, रामकृष्ण बाविस्कर, प्रदिप भाऊराव वाघ, शिसोदे, मनोज पवार, आ. किशोर पाटील यांचे स्वीय सहाय्यक राजू पाटील, विभागीय अधिकारी नेरपगार, शाखाधिकारी संजय साळुंखे, कर्मचारी सुनिल चौधरी यांच्यासह त्यांचे सर्व आप्तेष्ट नातेवाईक उपस्थित होते. या निर्णयामुळे समाजात सहकार भावनेचा व कार्यकर्तव्य निष्ठेचा एक वेगळा आदर्श निर्माण झाला आहे.

# नेरी प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाला नाशिक विभागात उत्कृष्ट आरोग्य निरीक्षक पुरस्कार

**प्रतिनिधी । जामनेर**

नाशिक विभागामार्फत दरवर्षी प्रदान केला जाणारा यंदाचा मानाचा उत्कृष्ट आरोग्य निरीक्षक पुरस्कार सन २०२४-२५ या वर्षासाठी तालुक्यातील नेरी प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाला आहे.

या प्राथमिक आरोग्य केंद्रातील नवनियुक्त आरोग्य निरीक्षक सोपान विठ्ठल राठोड यांनी त्यांच्या पहिल्याच वर्षात आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट नियोजनबद्ध व परिणामकारक कार्य करून हा सन्मान पटकावला आहे. ही जामनेर तालुक्यासाठी आणि जळगाव जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा, कीटकजन्य आजार नियंत्रण, साथ रोग प्रतिबंध, जनजागृती मोहिमा, लसीकरण, क्षयरोग, कुष्ठरोग, सिकलसेल, मानव विकास कार्यक्रम, स्वच्छता आणि शासनाचे विशेष नवनवीन आरोग्य उपक्रम यामध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली साधलेली प्रगती उल्लेखनीय ठरली. जळगाव जिल्हा हिवताप अधिकाऱ्यांनी राठोड यांच्या संपूर्ण दप्तराची तपासणी केली. हा प्रस्ताव सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, नाशिक विभाग, डॉ. विवेक खतगावकर यांच्याकडे सदर केला असता, त्यांनी या कार्याची दखल घेत त्यांची पुरस्कारासाठी निवड केली.

## एरंडोल तालुक्यात पावसाचे आगमन

**प्रतिनिधी । एरंडोल**

गेल्या दहा पंधरा दिवसापासून दांडी मारलेल्या पावसाने काल रोजी दुपारून जोरदार सुरुवात झाली. सदर पावसामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. खरीप हंगामासाठी या पावसाची अत्यावश्यक गरज होती. अर्धा महिना विना पावसाने खरीप पिकावर होणारा परिणाम यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत असताना १५ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजेपासून शहर व तालुक्यात पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे खरीप हंगामाच्या पिकांना लाभ मिळणार आहे. सदर पावसामुळे खरीप हंगामाला फायदा होणार असून शेतकरी वर्गात आनंद पसरला आहे. या पावसामुळे पिकांना संजीवनी मिळणार असून थांबलेल्या कीटकनाशकाची फवारणी पुन्हा जोमाने सुरू होईल.

## महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सदुरु महिला उद्योग अग्रेसर

**प्रतिनिधी । पारोळा**

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औवचित्य साधून सदुरू महिला उद्योग आणि बोरोटन ई-शॉपी यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या आठ वर्षांत हजारो महिला-मुलींना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्न करीत असून ४० दिवसाचे स्वयंरोजगार प्रशिक्षण राबविले जात आहे.

शिवण क्लास, पार्लर, मेहंदी असे कमी खर्चात माफक दराने क्लास घेतले जातात त्यात अनुभवी ट्रेनरसह होतकरू मुलींना किट देण्यात आले. तसेच अल्प दरात स्वयंरोजगार प्रशिक्षण उपलब्ध बोरोटान ई-शॉपी ट्रेड प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे एमडी



ज्ञानेश्वर पाटील यांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत होत आहे. पारोळा तालुक्यातील ७० महिलांचे कोर्स कंप्लेंट झाले असून त्यांना स्वयंरोजगार प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच या सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वाटप पुढील व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. त्यावेळी अनेक महिलांनी त्यांच्या कलागुण सादर केले. बोरोटॉन कंपनीचे पारोळा येथील विश्वास पाटील, अंमळनेर येथील अशोक जाधव व आहीरराव यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी सदुरू महिला उद्योगाच्या अध्यक्षा सुवर्णा पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## टीव्ही, मोबाईल न पाहता मुलांना वेळ देणार; तेली समाज बांधवांची शपथ

**प्रतिनिधी । बोदवड**

आज टीव्ही व मोबाईल यांचे व्यसन मोठ्या प्रमाणात जडलेली आहे. ते बंद करण्यासाठी आपण सर्वांनी समाज बांधवांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे, असा सूर उमटला. तेली समाज बहुउद्देशीय सेवा संस्थेची १५ ऑगस्ट रोजी सर्वसाधारण सभा घेण्यात आली. यात प्रथम संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यानंतर डॉ. दिलीप तेली यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे अध्यक्ष दीपक चौधरी यांनी संस्थेला कराव्या लागणाऱ्या कामांविषयी समाज बांधवांशी चर्चा केली. तेली समाजाची बोदवड तालुकास्तरीय जनगणना करावी. या विविध मुद्यांसह विवाह इच्छुक मुलां-मुलींची माहिती हा मुद्दा सुद्धा तयार केला.

## • निधन वार्ता

### शंकर रघुनाथ शिंपी

**जळगाव ।** येथील रहिवासी



पत्रकार किशोर शंकर शिंपी (ह.मु. आर. एल. कॉलनी, पिंप्राळा) यांचे वडील शंकर रघुनाथ शिंपी (वय ९५) यांचे दि.१५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## वर्ल्ड फॉर नेचरतर्फे निसर्गाबाबत जनजागृती

**प्रतिनिधी । भुसावळ**

जपला तरच निसर्ग भविष्य सुरक्षित राहील, असा संदेश वर्ल्ड फॉर नेचर संस्थेमार्फत जनतेपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. संस्थेचे जिल्हाध्यक्ष भूषण पाठे यांच्या पुढाकाराने आणि आरोग्य विभागाच्या संयुक्त सहकार्याने तब्बल ८० देशी वृक्षांची लागवड नुकतीच करण्यात आली.

तपत कठोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच फेकरी, सुसरी, तळवेल येथील उपआरोग्य केंद्रांच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली. या उपक्रमात प्रामुख्याने देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली असून, पर्यावरण समतोल राखण्याच्यी दृष्टीने याचे विशेष महत्त्व आहे.

या उपक्रमासाठी डॉ. हर्षद वाजपेयी, डॉ. नीलेश क्षीरसागर, तसेच डॉ. पांढरे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष भूषण पाठे यांनी देशी वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व, वन्यजीव व पक्षी संरक्षणातील भूमिका, तसेच निसर्ग संतुलन राखण्यासाठी आवश्यक असलेले योगदान यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाला वर्ल्ड फॉर नेचर संस्थेचे सचिव किरण पाठे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## हिवरा येथे कृषी विभागातर्फे बांधावर जाऊन पीक रोगांच्या नियंत्रणासाठी मार्गदर्शन

**प्रतिनिधी । मुक्ताईनगर**

तालुक्यातील हिवरे शेतशिवारात रिपरिप पाऊस सुरू असतानाही उपविभागीय कृषी अधिकारी हर्षदा देसले यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांवरील रोगांच्या नियंत्रणासाठी मार्गदर्शन केले.

बदलत्या हवामानामुळे पिकांवर वाढलेल्या किड व रोगांच्या पार्श्वभूमीवर मुक्ताईनगर तालुक्यातील हिवरे येथे कृषी विभागाच्या वतीने पिक संरक्षण सल्ला अंतर्गत कार्यक्रम घेण्यात



आला. या वेळी उपविभागीय कृषी अधिकारी हर्षदा देसले यांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी मुक्ताईनगर कृषी महाविद्यालयाचे डॉ. सागर बंड, किटकनाशक विभागाचे सहाय्यक प्राध्यापकांनी कपाशी पिकांवरील किड व रोगांच्या ओळख, नियंत्रणाच्या दृष्टीने रासायनिकसह पर्यावरणपूरक जैविक पद्धतीच्या वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. नियमित पिक निरीक्षण शिफारस केलेल्या किटकनाशकांचा योग्य प्रमाणात वापर, तण व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. खर्च कमी करून उत्पादन वाढीवर भर देण्यात आला. तर शेतकऱ्यांच्या शंकेचे निरसन करण्यासाठी योग्य वेळ देण्यात आली. या वेळी हिवरा येथील रवी पाटील, तालुका कृषी अधिकारी अभिजित शेंडे, मंडळ कृषी अधिकारी अशोक पाटील, उपकृषी अधिकारी सुनील उदळकर, सहाय्यक कृषी अधिकारी अर्चना इंगळे, दर्शन पटेल, सुधीर नवले, नीलेश काळुखे आदींसह शेतकरी उपस्थित होते.

# समन्वयाने काम करा अन् योजनांची गती वाढवा

## • धरणगाव पंचायत समिती आढावा बैठकीत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

**प्रतिनिधी । धरणगाव**

**पाळधी येथे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या उपस्थितीत धरणगाव पंचायत समितीची आढावा बैठक उत्साहात झाली. या बैठकीत समन्वयाने काम करा आणि योजनांची गती वाढवा, असे निर्देश पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.**




ग्राम रोजगार सेवकांनी आत्मीयतेने काम करून गावोगावी शासनाच्या योजना पोहोचवाव्यात. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवणे ही सेवा समजून काम केले पाहिजे. वर्क ऑर्डर झालेल्या कामांना गती देऊन दर्जेदार व मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी विविध विभागांच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. शासनाच्या योजनांमध्ये अनावश्यक विलंब होऊ न देता मंजूर प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांचा विश्वास जिंकावा, असे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, मोदी आवास योजना, शबरी आवास योजना तसेच जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना आणि पंचायत समिती अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, डी.आर.डी.ए.चे प्रकल्प संचालक राजू लोखंडे, तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी, गटविकास अधिकारी तुषार वानखेडे, पा.पु. व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सचिन पानझडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय महाजन, गटशिक्षणाधिकारी भावना भोसले, शेतकी संघ अध्यक्ष गजानन बापू पाटील, संजय महाजन, डी. ओ. पाटील, माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, पी.एम. पाटील, रवींद्र चव्हाण यांच्यासह तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

## आंबेडकरी विचारांचे साहित्य मन अन् माणसांना वैचारिक अंगाने समृद्ध करते : प्रा.डॉ.जाधव

**प्रतिनिधी । भुसावळ**

जीवनानुभव आणि सामाजिक चळवळींच्या अनुभवांतून निर्माण झालेले आंबेडकरी विचारांचे साहित्य मानवी मनांना आणि माणसांना वैचारिक अंगाने समृद्ध करते. अशा साहित्याला काळाच्या मर्यादा नसतात ते चिरकाल टिकणारे असते, असे प्रतिपादन मराठी साहित्यातील ज्येष्ठ समीक्षक, कवी, लेखक आणि विचारवंत प्रा.डॉ. मनोहर जाधव (पुणे) यांनी केले.

ते पिकलं पान या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. दिवंगत कवी के.एफ.मोरे यांच्या पिकलं पान या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ वरणगाव फॅक्टरी येथे स्वातंत्र्यदिनी झाला. प्रकाशन समारंभास लेखक व विचारवंत जयसिंग वाघ, प्रा.डॉ. जतिन मेढे, पडवेकर, दीपध्वज कोसोदे, उपप्राचार्य डॉ. संजय साळवे उपस्थित होते. प्रा.डॉ. मनोहर जाधव यांनी आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात नव्या पिढीत वाचन संस्कृतीचे प्रमाण कमी होताना दिसते. तसेच विविध अनुभवांनी समृद्ध असलेल्या दिवंगत के. एफ. मोरेंच्या कवितेत ही अनुभवांची ची विविध रूपे दिसतात,असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविक आनंद मोरे यांनी केले. सूत्रसंचालन अरुणा इंगळे यांनी तर आभार दीपक मोरे यांनी मानले.